৫৮

महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण भाग चार-अ

वर्ष १, अंक ६०] सोमवार, ऑक्टोबर १२, २००९/आश्विन २०, शके १९३१ [पृष्ठे २७
किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक ११८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

अल्पसंख्याक विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ ऑक्टोबर २००९

अधिसूचना

हज समिती अधिनियम, २००२.

क्रमांक हज. २००५/प्र.क्र.७/०५/का. ५.—राज्य शासन, हज समिती अधिनियम, २००२ च्या खंड ४७ अन्वये ( २००२ चा ३५) व यासंबंधी त्यास प्राप्त सर्व अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात अस्तित्वात असलेले सर्व नियम, अधिसूचना आणि आदेश अधिक्रमित करून, शासनास प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून तसेच केंद्र शासनाशी विचारविनिमय करून पुढीलप्रमाणे नियम बनवीत आहे, अर्थात :—

१. संक्षिप्त नाव.—या नियमांस, महाराष्ट्र राज्य हज समिती नियम, २००९ असे संबोधण्यात यावे.

## प्रकरण १

## प्रारंभिक

२. **व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(क) " अधिनियम " याचा अर्थ, हज समिती अधिनियम, २००२ ( २००२ चा ३५) असा आहे,

(ख) " अध्यक्ष " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य हज समितीचे अध्यक्ष आहे,

(ग) " स्थानिक प्राधिकारी (स्थानिक स्वराज्य संस्था) " याचा अर्थ,

(एक) बृहन्मुंबई महानगरपालिका, ज्याची स्थापना मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) अन्वये झाली आहे ;

(दोन) महानगरपालिका, ज्याची स्थापना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) अन्वये झाली आहे ;

(तीन) नागपूर महानगरपालिका, ज्याची स्थापना नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा सीपी आणि ब्रार २) अन्वये झाली आहे ;

(चार) नगर परिषद, ज्याची स्थापना महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक शहरे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ६०) अन्वये झाली आहे ;

(पाच) जिल्हा परिषद, ज्याची स्थापना महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) अन्वये झाली आहे ;

(घ) " परिशिष्ट " म्हणजे, या नियमासोबतचे परिशिष्ट असा आहे ;

(च) " खंड " म्हणजे अधिनियमाचा खंड असा आहे ;

(छ) " राज्य " म्हणजे महाराष्ट्र राज्य असा आहे ;

(ज) " राज्य शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन असा आहे ;

(झ) " राज्य हज समिती " याचा अर्थ, खंड १८ अन्वये गठीत महाराष्ट्र राज्य हज समिती असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांची व्याख्या नियमांमध्ये करण्यात आलेली नाही; परंतु अधिनियमांमध्ये व्याख्या दिलेली आहे, त्या शब्दांची व शब्द प्रयोगांची व्याख्या अधिनियमांमध्ये करण्यात आली आहे तीच असेल.

३. **राज्य हज समितीचे मुख्यालय.**---राज्य हज समितीचे मुख्यालय मुंबई येथे राहील.

## प्रकरण २

## राज्य हज समितीच्या सदस्यांचे नामनिर्देशन व पुन: नामनिर्देशन

४. राज्य हज समितीच्या सदस्यांच्या नामनिर्देशनाची रित.---खंड १८ मधील तरतुदींच्या अनुषंगाने, राज्य हज समितीच्या सदस्यांच्या नामनिर्देशनाच्या प्रक्रियेस व अनुवर्तीस राज्य शासन जबाबदार राहील.

५. संसद/ विधीमंडळ सदस्यांचे नामनिर्देशन.---(१) राज्य शासन प्रत्येकी एक याप्रमाणे संसदेकडून, विधानसभेच्या सभापतीकडून तसेच विधानपरिषदेच्या अध्यक्षांकडून कलम १८ (१) (एक) अन्वये, राज्य हज समितीच्या गठनाच्या चार महिन्यांपूर्वी नामनिर्देशनाद्वारे अर्ज मागवेल :

परंतु , असे की, जर एखाद्या सदस्याचे राज्य हज समितीवर या उपनियमाखाली निवड झाली असताना,

(अ) त्या सदस्याचे संसद सदस्यत्व किंवा विधानसभेचे सदस्यत्व किंवा विधानपरिषदेचे सदस्यत्व रद्द झाले असेल, किंवा

(ब) कलम २३ अन्वये सदर सदस्यास अपात्र ठरविण्यात आले असेल तर, राज्य शासन संसदेकडून किंवा सभापती, महाराष्ट्र विधानमंडळ किंवा अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडून नव्याने नामांकन पत्र मागवेल.

(२) खंड १८ च्या उपखंड (१) च्या उपखंड (२) व (३) अनुसार राज्य हज समितीवरील तीन सदस्यांच्या नामनिर्देशनाची पद्धती पुढीलप्रमाणे राहील :—

(अ) (एक) या नियमांच्या परिशिष्टातील प्रत्येक परिमंडळातील स्थानिक स्वराज संस्थावरील निर्वाचित मुस्लिम सदस्यांची, मुंबई किंवा नागपूर किंवा औरंगाबाद येथे बैठक आयोजित करण्यात यावी ;

(दोन) वरील उपनियमामध्ये उल्लेख केलेल्या बैठकीचे अध्यक्षपद, राज्य शासनाच्या, अल्पसंख्याक विकास विभागातील अवर सचिव पदापेक्षा कनिष्ठ नाही अशा पदावरील अधिकाऱ्याने धारण करावे.

(ब) (एक) एकत्रित जमलेल्या सदस्यांनी त्यांच्यातून एका सदस्याची निवड करावी ;

(दोन) उपनियम २ (अ) च्या उपवाक्य (२) मधील संदर्भित सभाध्यक्षाने निवडणुकीचे कामकाज संपल्यानंतर संबंधित सदस्यांची निवड प्रमाणित करावी आणि असे प्रमाणित करण्यात आल्यानंतर संबंधित सदस्याची निवड ही अंतिम असेल ;

(तीन) उप नियम २ अन्वये निवड करण्याकरिता झालेल्या बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांना प्रवास व दैनिक भत्ता त्यांच्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी अदा करावा ;

(चार) राज्य शासन खंड १८ च्या उपखंड (१) च्या (३) व (४) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गातील ८ मुस्लिम सदस्य नामनिर्देशित करील ;

(पाच) राज्य शासन, खंड १८ अनुसार निवड व नामनिर्देशनाची प्रक्रिया राज्य हज समितीचे गठन किंवा पुनर्गठन करण्यापूर्वी किमान एक महिना आधी पूर्ण करण्याचा प्रयत्न करील ;

(सहा) राज्य शासन, राज्य हज समितीच्या सदस्यांची नावे खंड १९ अन्वये अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत राज्य हज समितीच्या सर्व सदस्यांची खंड २१ च्या उपखंड (१) मधील अटींच्या अधिन राहून त्यांच्यामधून अध्यक्ष निवडण्याकरिता बैठकीचे आयोजन करील.

६. सदस्यांचे पुनः नामनिर्देशन.—(१) सदस्यांचे पुनः नामनिर्देशन पुढीलक्रमाने नियमित करण्यात येईल :—

(क) विधीवत स्थापन झालेल्या संसद, विधानमंडळातून नामनिर्देशित करण्यात आलेल्या तीन सदस्यांपैकी संसद सदस्यांपासून आळीपाळीने एका सदस्याचा पुनः नामनिर्देशनाकरिता विचार करण्यात यावा ;

(ख) नियम ५ च्या उपनियम (२) अन्वये नामनिर्देशनाकरिता निवडण्यात आलेल्या तीन परिमंडळातील एका सदस्याचा पुनः नामनिर्देशनाकरिता विचार करण्यात यावा. विविध परिमंडळात महानगरपालिकेपासून सुरुवात करून आळीपाळीने एका सदस्याचा पुनः नामनिर्देशनाकरिता विचार करण्यात यावा ;

(ग) खंड १८ च्या उपखंड (३) व (४) अन्वये राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या ८ सदस्यांपैकी प्रत्येक प्रवर्गातून दोन व चार पेक्षा जास्त नाहीत इतक्या सदस्यांना पुनः नामनिर्देशित करण्य येतील.

## प्रकरण तीन

## राज्य हज समितीच्या बैठका व इतर बाबी

७. **राज्य हज समितीची बैठक बोलाविण्याबाबत व त्याबाबतची कार्यपद्धत.**—(१) राज्य हज समितीच्या अध्यक्षांची निवड किंवा नियुक्ती झाल्यानंतर खंड २१ अन्वये राज्य हज समितीची बैठक, अध्यक्षांनी ठरविलेल्या दिवशी, वेळी व ठरविलेल्या जागी घेण्यात येईल.

(२) (एक) परंतु, कोणत्याही कारणांमुळे अशी बैठक उपनियम (१) अनुसार ठरविलेल्या दिवशी होऊ शकली नाही, तर ती अध्यक्षांनी निश्चित केलेल्या इतर कोणत्याही दिवशी घेण्यांत येईल ;

(दोन) त्यानंतर, खंड २८ च्या उपखंड (१) व (२) अनुसार, अध्यक्षांस आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, हज यात्रेच्या तयारीसंबंधी आढावा घेण्याकरिता अध्यक्षांस सोईस्कर वाटेल अशा दिवशी राज्य हज समितीची बैठक घेण्यात येईल.

(३) अध्यक्षांस, बदनामीकारक व अत्यंत प्रक्षोभक अशा प्रस्तावाची सूचना वगळण्याचे स्वातंत्र्य असेल, आणि त्यांस योग्य वाटल्यास सदर मुद्यावर संपूर्ण प्रस्तावास अनुमती नाकारू शकेल. अध्यक्ष, त्यांच्या मते बदनामीकारक व अत्यंत प्रक्षोभक बाबी बैठकीच्या कार्यवृत्तांतून वगळण्याचे निदेश देईल.

(४) अध्यक्ष पुढील बाबींस अनुमती नाकारू शकेल :—

(अ) सदस्यांनी सादर केलेले प्रस्ताव ज्यामध्ये सदस्य किंवा त्यांचा सहकारी किंवा इतर कोणताही सहयोगी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे यात्रेकरूंच्या वाहतुकीशी संबंधित उद्योगाच्या व्यवस्थापन / किंवा संचालनामध्ये हितसंबंधी असेल किंवा त्यांच्यापैकी कोणीतरी सदर व्यवसायातील व्यक्तीच्यावतीने वा व्यावसायिकरित्या हितसंबंधित असेल;

(ब) असा कोणताही प्रस्ताव, ज्यामध्ये प्रस्ताव सादर करणारा त्यामधील विधानांबाबत, त्याच्या सत्यतेबाबत कोणतीही ठोस माहिती देवू शकत नाही.

(५) (एक) अध्यक्ष, हरकतीचे मुद्दे किंवा कार्यपध्दतीबाबत तडकाफडकी निर्णय घेवू शकेल, परंतु त्यांच्या निर्णयाबाबत राज्य हज समितीच्या त्यापुढील बैठकीत पुनर्विलोकन करता येवू शकेल;

(दोन) अशा पुनर्विलोकनाच्या प्रस्तावाची सूचना प्रत्यक्ष, सदर निर्णयास आव्हान देणाऱ्या मूळ प्रस्तावाच्या स्वरूपात, आयोजित करण्यात आलेल्या बैठकीच्या दिनांकापूर्वी पूर्ण तीन दिवस अगोदर राज्य हज समितीस पाठविण्यात आली पाहिजे.

(६) अध्यक्ष, बैठकीस उपस्थित सदस्यांच्या सहमतीने कोणत्याही सदस्यांस, बैठकीसमोर विचारार्थ ठेवण्यात आलेल्या विषयांव्यतिरिक्त प्रस्ताव सादर करण्यास अनुमती देवू शकेल.

(७) अध्यक्ष, राज्य शासनाच्या हज यात्रेसंबंधी बाबी हाताळणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास, राज्य हज समितीच्या कोणत्याही बैठकीस "विशेष आमंत्रित" म्हणून आमंत्रित करू शकेल, आणि अधिकाऱ्यास बैठकीतील चर्चेत सहभागी होण्यास सहमती देता येईल.

८. **अध्यक्ष व सदस्यांच्या अनुज्ञेय भत्ते व इतर अटी आणि शर्ती.**—(१) राज्य हज समितीचे अध्यक्ष व सदस्य यांना, राज्य हज समितीच्या बैठकांस उपस्थित रहाण्याकरिता तसेच भारतात वा परदेशातील दौऱ्याच्या अनुषंगाने, भारत सरकारच्या गट "अ" अधिकाऱ्यास अनुज्ञेय असलेल्या दराने प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल :

परंतु असे की, संसद सदस्य, विधीमंडळ सदस्य व स्थानिक स्वराज्य संस्थेतील निर्वाचित सदस्य, जे राज्य हज समितीचे सदस्य आहेत, त्यांना वरील भत्ते त्यांना लोकसभा, राज्यसभा किंवा विधानसभा, विधान परिषद किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यापैकी जे लागू असेल त्या नियमांनुसार अनुज्ञेय दराने अनुज्ञेय असतील :

परंतु पुढे असे की, अध्यक्ष किंवा कोणत्याही राज्य हज समिती सदस्यांच्या प्रस्तावित दौऱ्यास केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने मान्यता दिलेली असली पाहिजे :

परंतु आणखी असे की. एका परदेश दौऱ्यावर एका वेळी, अध्यक्षांसह राज्य हज समितीच्या तीन सदस्यांपेक्षा जास्त सदस्य प्रवास करणार नाहीत.

## प्रकरण चार

## राज्य हज समितीचे कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांच्या अटी व शर्ती

९. **कार्यकारी अधिकारी यांची कार्ये.**—खंड २९ च्या उपखंड (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला कार्यकारी अधिकारी, राज्य हज समितीचे निर्णय अंमलात आणील व त्याच्या दैनंदिन कामकाजामध्ये सदर निर्णय अंमलात आणण्याबाबत राज्य हज समितीच्या निदेशांचे पालन करील.

१०. **कार्यकारी अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या.**—(१) कार्यकारी अधिकारी हे राज्य हज समितीचे पदसिध्द सचिव असतील व ते खालील बाबींस जबाबदार असतील :—

(क) राज्य हज समितीच्या सदस्यांना बैठकांच्या सूचना पाठविणे,

(ख) राज्य हज समितीच्या बैठकांचे कार्यवृत्त नोंदविणे,

(ग) पुढील सर्व पत्रव्यवहार पहाणे,

(१) यात्रेकरू व समिती ;

(२) राज्य हज समिती व राज्य शासन ; व

(३) राज्य हज समिती व खंड ९ मध्ये नमूद केलेले विविध प्राधिकारी.

(२) कार्यकारी अधिकारी शासनाच्या पूर्वसंमतीने नियम ९ च्या अधीन राज्य हज समितीने शासनाच्या संमतीने निदेशित केलेली कामे करील.

(३) कार्यकारी अधिकारी, नियम १२ च्या उपनियम (४) मधील तरतुदीचे पालन करण्याकरिता कालावधीसह पुढील प्रस्ताव तयार करून राज्य हज समितीसमोर ठेवील.

(क) राज्य हज समितीच्या इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदनामे व श्रेण्या यांची माहिती ठेवणे, त्यांच्या नियुक्तीसंबंधी (विभागीय पदोन्नती समितीच्या नियुक्तीसह) कार्यपध्दती व त्यांच्या मते किती अधिकारी व कर्मचारी नियुक्त्या करण्यात यावेत, व

(ख) त्यांच्या मते, अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना वेतन, फी व भत्ते किती द्यावेत.

(४) राज्य हज समिती, उपनियम ३ मध्ये नमूद केलेल्या अशा प्रस्तावांस मान्यता देईल किंवा त्यामध्ये राज्य शासनाच्या पूर्व संमतीने, त्यात आवश्यक वाटतील अशा सुधारणा करील.

११. **राज्य हज समितीचे अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची कार्ये.**---(१) खंड २९ च्या उपखंड (४) अन्वये नियुक्त सर्व अधिकारी व इतर कर्मचारी हे कार्यकारी अधिकाऱ्यांना जबाबदार राहतील व त्यांच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करतील.

(२) कार्यकारी अधिकारी हा, सदर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्षपणे राज्य हज समितीस जबाबदार राहील.

१२. कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाशर्ती.---(१) राज्य हज समितीचे कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी आणि कर्मचारी सर्वसाधारणपणे अस्थायी स्वरुपात नियुक्त करण्यात यावेत.

(२) शासन निश्चित करील अशा दिनांकास राज्य हज समितीच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करील व सदर पदांवर जे कर्मचारी पूर्वीपासून अशा पदावर काम करीत असतील त्यांच्या नियुक्त्या करील.

(३) (क) राज्य हज समितीवर प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात आलेल्या, कार्यकारी अधिकारी व अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा दोहोपैकी कोणाकडूनही संबंधित प्रतिनियुक्ती ज्या नियमांद्वारे नियमित करण्यात आल्या असतील त्या नियमानुसार सूचना देवून केव्हाही संपुष्टात आणता येतील.

(ख) राज्य हज समितीच्या उपनियम (क) मध्ये नमूद केलेल्या नियुक्त्या व्यतिरिक्त इतर नियुक्त्या, सदर नियुक्त्या ज्या नियमांद्वारे नियमित करण्यात आल्या असतील त्या नियमांनुसार दोहोपैकी कोणाकडूनही सूचना देवून केव्हाही संपुष्टात आणता येतील :

परंतु असे की, या उप नियमाखालील राज्य हज समितीतर्फे देण्यात येणाऱ्या सूचनेस शासनाच्या पूर्व मंजुरीने देईल.

(४) राज्य हज समिती, शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निश्चित करील त्याप्रमाणे वेतन, भत्ते व वित्तलब्धी कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी व इतर कर्मचारी यांना मिळेल.

(५) (क) अध्यक्ष, राज्य शासनाने निश्चित केलेल्या कमाल कालावधीपर्यंत, नैमित्तिक रजा वगळता इतर रजा राज्य हज समितीचे कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी व इतर कर्मचारी यांना मंजूर करू शकतील;

(ख) अध्यक्ष, शासनाच्या मान्यतेने, रजेमुळे रिक्त झालेली पदे तात्पुरत्या स्वरुपात अन्वये भरू शकतील.

(६) एकावेळी ४ दिवस, परंतु वर्षभरात एकूण ८ दिवस नैमित्तिक रजा

(क) अध्यक्ष, कार्यकारी अधिकाऱ्यांस, व

(ख) कार्यकारी अधिकारी, राज्य हज समितीच्या इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांस मंजूर करू शकेल.

१३. **राज्य हज समितीच्या इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती.**---(१) नियम १० च्या उपनियम (३) व (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य शासनाने मंजूर केलेल्या कार्यपध्दतीनुसार राज्य हज समिती त्यास योग्य वाटेल अशा अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करील.

(२) राज्य हज समितीच्या प्रशासकीय बाबींसंबंधी सर्व बाबी महाराष्ट्र शासनाच्या, महाराष्ट्र राज्य नागरी सेवा नियम, १९८१ व त्यास पूरक नियमानुसार निर्णय घेण्यात यावा.

(३) राज्य हज समितीच्या अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना, राज्य शासनाच्या समकक्ष कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय दराने भत्ते अनुज्ञेय राहतील.

(४) राज्य हज समितीच्या इतर अधिकारी व कर्मचारी, राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी राज्य हज समितीने मंजूर केल्याप्रमाणे मानधन, अंशदायी भविष्यनिर्वाह निधी, रजा प्रवास सवलत व इतर भत्ते मिळण्यास पात्र असतील.

(५) राज्य हज समितीच्या कार्यालयांची कोणत्याही शहरातील सर्वसाधारण कार्यालयीन वेळ ही राज्य शासनाच्या त्या शहरातील कार्यालयांच्या वेळेनुसार असेल.

(६) राज्य हज समिती, त्यांच्या कार्यालयात राज्य शासनाने जाहीर केलेल्या सुट्ट्या पाळील.

## प्रकरण पाच

## राज्य हज निधी

१४. **राज्य हज निधीच्या ताब्यासंबंधीच्या तरतुदी.**----(१) या अधिनियम व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतुदींच्या अधीन खंड ३२ अनुसार "राज्य हज निधी " मध्ये सर्व रकमा जमा करण्यात याव्यात व त्याचा वापर अधिनियमातील खंड ३३ मध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी वापर करण्यात यावा.

(२) राज्य हज निधी, स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा इतर राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल त्यानुसार जमा करण्यात यावा.

(३) (एक) जेथे सर्व आर्थिक व्यवहारात, राज्य हज समितीचा कोणताही सदस्य, अधिकारी किंवा कर्मचारी त्यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने पक्षकार आहे, अशा व्यवहाराची तात्काळ व कोणतीही बाब लपवून न ठेवता, हिशोबात घेऊन त्याची नोंद राज्य हज समितीच्या लेख्यांमध्ये घेण्यात यावी;

(दोन) चालू खर्च भागविण्याकरिता, बँकेतून काढून घेतलेले पैसे वगळता मिळालेली सर्व रक्कम सदर रक्कम मिळाल्याच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्या दिवशी बँकेस सुट्टी असल्यास त्याच्या संपूर्णतः दुसऱ्या दिवशी बँकेतील राज्य हज समिती निधी खात्यात जमा करण्यात यावेत.

(४) राज्य हज निधीतून बँकेने, पुढील व्यक्तींनी एकत्रितपणे धनादेश सही केला नसल्यास रक्कम प्रदान करू नये.

(क) राज्य हज समितीचे, कार्यकारी अधिकारी व कक्ष अधिकारी, किंवा

(ख) कार्यकारी अधिकारी यांच्या आजारपण किंवा अनुपस्थितीत कक्ष अधिकारी व वित्तिय स्थायी समितीचे अध्यक्ष किंवा राज्य हज समितीने याकरिता प्राधिकृत केलेले कोणताही इतर सदस्य, किंवा

(ग) जेव्हा कार्यकारी अधिकारी किंवा कक्ष अधिकारी उपलब्ध नसतील, तेव्हा वित्तीय स्थायी समितीचे अध्यक्ष वा राज्य हज समितीने त्याकरिता प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही एक सदस्य.

परंतु सदस्यांनी केलेल्या व्यवहाराचा संपूर्ण तपशील अध्यक्षांसमोर लेखी मान्यतेकरिता ठेवण्यात यावा.

१५. **खर्चाची देयके व त्याचे प्रदान.**---(१) शासकीय कार्यालयांकरीता राज्य शासनाने विहित केलेल्या देयकांमध्ये राज्य हज समितीच्या प्रत्येक खर्चाची बाब दर्शविण्यात यावी.

(२) (एक) प्रदानाकरिता सादर करण्यात आलेले प्रत्येक देयक व त्यासोबतची कागदपत्रे, कार्यकारी अधिकारी यांनी तपासून पहावीत व दावा ग्राह्य असेल, प्राधिकार सक्षम व स्वाक्षरी खरी तसेच नियमानुसार असेल तर, तो सदर देयक प्रदान करण्याचे आदेश देईल व त्यावर स्वाक्षरी करील.

(दोन) कार्यकारी अधिकाऱ्याने देयक पूर्ण व आवश्यक ती सर्व माहिती, जसे की प्रदानाचे स्वरुप व ज्या कारणांकरिता देयक मंजूर करण्यात आले आहे त्या आदातास (payec) प्रत्यक्ष रक्कम प्राप्त झाली आहे, त्याला विधीवत स्वरुप असल्याचे प्रमाणित करेल.

१६. **राज्य हज निधी मधील बाकी रकमेची गुंतवणूक.**---(१) नियम १४ च्या उपनियम (२) मध्ये काहीही असले तरी राज्य हज समिती, राज्य शासनाच्या मदतीने राज्य हज निधीतील बाकी रक्कम (देणग्या, मालमत्तेद्वारा मिळालेली मिळकत इत्यादी) राष्ट्रीयकृत बँकांच्या नियत ठेवीमध्ये, किंवा भारत सरकारने हमी दिलेल्या शासकीय रोख्यांमध्ये गुंतवू शकेल व त्यानुसार, आवश्यक असेल त्यानुसार सदर रोख्यांची विल्हेवाट लावण्यात यावी.

(२) उपनियम (१) मध्ये उद्‌धृत कलेल्या कोणत्याही नियत ठेवी किंवा रोख्यांद्वारे मिळालेले उत्पन्न राज्य हज निधीत जमा करण्यात यावे.

१७. **राज्य हज निधीचा विनियोग.**----राज्य हज निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या निधीचा विनियोग नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांकरिता लागणाऱ्या रकमा, आकार व खर्च याकरिता करण्यात यावा. ज्यामध्ये,—

(क) राज्य हज समितीचे कार्यकारी अधिकारी, व इतर अधिकारी व कर्मचारी तसेच राज्य हज समितीच्या विनंतीनुसार ज्यांच्या सेवा राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या आहेत, अशा इतर कोणत्याही कर्मचाऱ्याचे वेतन व भत्ते ;

(ख) या नियमाचे प्रदान करावयाचे अंशदायी भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतन, उपदान, रजावेतन व अनुकंपा भत्ते ;

(ग) नियम ८ नुसार मुंबईत वास्तवास नसलेल्या राज्य हज समिती सदस्यांचा प्रवास व दैनिक भाग ;

(घ) राज्य हज समितीच्या नियमित कर्मचारीवृंदापैकी २० टक्क्यांपेक्षा जास्त नाहीत अशा, हज मोसमात सौदी अरेबिया येथे भेट देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा प्रवास व दैनिक भत्ता;

(च) राज्य हज समितीस वैधरितीने देय रक्कम.

१८. **संविदा करण्यास व खर्च करण्याची राज्य हज समितीची प्रक्रिया.**---(१) या नियमातील इतर तरतुदींच्या अधीन, कार्यकारी अधिकारी, खंड २७ आणि या नियमांमध्ये नमूद केलेली कर्तव्ये पार पाडण्याकरिता आवश्यक संविदा (करार) करण्यास या खर्च करण्यास सक्षम आहे.

(२) प्रत्येक संविदा किंवा खर्च,---

(क) ज्यांचे मूल्य वा देय रु.२५०० पेक्षा जास्त, परंतू रु.५०००० पेक्षा जास्त नाही, त्यास राज्य हज समितीची पूर्व मंजूरी आवश्यक आहे;

(ख) ज्याचे मूल्य वा देय रु.५०००० पेक्षा जास्त आहे, त्यांस राज्य शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक आहे :

परंतू असे की, या उपनियमातील विनिर्दिष्ट कोणतीही बाब, पुढील बाबींवरील खर्चास लागू होणार नाही, जे---

(एक) हज यात्रेकरूंकडून किंवा त्यांच्याकरीता प्राप्त प्रवास भाडे, प्रवास रक्कम, ठेव किंवा इतर कोणतीही ठेव;

(दोन) मृत हज यात्रेकरुंच्या चीज वस्तू विकून येणारी रक्कम;

(तीन) विमान प्रवास किंवा समुद्र प्रवासाकरिता विमान कंपन्या किंवा इतर संस्थाना देय व त्यांच्याकडून प्राप्त होणारी रक्कम.

(३) उप नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट प्रत्येक संविदा लिखित स्वरुपात कार्यकारी अधिका-यांनी स्वाक्षरी करून, अध्यक्ष व राज्य हज समितीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही एका सदस्याने प्रतिस्वाक्षरीत करून राज्य हज समितीची सर्वसाधारण मोहर लावून मोहरबंद करण्यात यावी.

(४) रु.५००० पेक्षा जास्त मुल्यदेय असलेला कोणताही जडसंग्रह (अविक्रेय माल) राज्य हज समितीच्या पूर्वमान्यतेशिवाय निर्लेखित करण्यात यऊ नये.

१९. **समितीचा अर्थसंकल्प तयार करणे, सादर करणे व मान्यता घेणे.**---(१) (क) अध्यक्ष, आर्थिक वर्ष संपण्याच्या तीन महिने अगोदर बोलाविण्यात यावयाच्या राज्य हज समितीच्या विशेष बैठकीत पुढील १ एप्रिलपासून सुरु होणाऱ्या वर्षाकरिता राज्य हज समितीच्या जमा व खर्चाबाबत प्रारुप तयार करण्याचे निदेश देईल ;

(ख) वरील तरतुदीत राज्य हज समितीसमोर ठेवण्यापूर्वी वित्तीय स्थायी समितीद्वारे तपासून मंजूर करण्यात येईल;

(ग) सदर अंदाजपत्रक तयार केल्यानंतर मुद्रित करून त्याची प्रत नोंदणीकृत डाकेने किंवा स्पीड पोस्ट किंवा कुरिअर सेवेमार्फत प्रत्येक सदस्यास विशेष बैठकीपूर्वी किमान दहा पूर्ण दिवस आधी पाठविण्यात यावी.

(२) [illegible] राज्य हज समितीच्या साधनसंपत्ती व आर्थिक स्रोत आणि खर्चाच्या अनुषंगाने, वार्षिक [illegible] अंदाजपत्रक तयार करताना, राज्य शासनाने विहित केलेल्या वित्तीय नियमांचे पालन करण्यात यावे.

(३) उप-नियम (१) अनुसार प्रस्तुत अंदाजपत्रकावर विचार करून व सदर अंदाजपत्रकामध्ये कोणतीही सुधारणा न करता किंवा सुधारणेसह जसे तीस योग्य वाटेल त्याप्रमाणे मंजूरी देईल.

(४) राज्य हज समितीने मंजूर केलेले अंदाजपत्रक, राज्य शासनाच्या मंजूरीकरिता प्रत्येक वर्षी १ सप्टेंबर रोजी किंवा तत्पूर्वी शासनास सादर करण्यात येईल.

(५) (क) राज्य हज समिती, ज्या वर्षाकरिता, उपनियम (३) अनुसार अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे, त्या कालावधीत कोणत्याही वेळी पूरक अंदाजपत्रक तयार करू शकेल.

(ख) अशा प्रत्येक पूरक अंदाजपत्रकावर राज्य हज समिती विचार करून मंजूरी देईल आणि जणू काही ते मूळ अंदाजपत्रक असल्याप्रमाणे राज्य शासनास मान्यतेकरिता सादर करील.

(६) अंदाजपत्रक समाविष्ट करण्यात आलेली व मंजूर केलेली प्रत्येक तरतूद म्हणजे खर्च करण्यास आपोआप मंजूरी मिळाली आहे असे समजण्यात येऊ नये आणि नियम १८ अन्वये कोणत्याही खर्चास विनिर्दिष्ट पूर्वमंजूरी प्राप्त करण्यात यावी.

(७) (क) राज्य हज समितीत राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय एका प्रधान शीर्षाखालील एका उद्दिष्टातून दुसऱ्या उद्दिष्टांकरिता पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार असतील.

(ख) परंतु, इतर पुनर्विनियोजनाकरिता राज्य शासनाची मंजूरी घेणे अपेक्षित आहे.

२०. **लेखे ठेवणे, लेखा परिक्षण व प्रकाशित करणे.**---(१) राज्य हज समितीचे लेखे अशा पध्दती व प्रारुपामध्ये ठेवण्यात येतील जे राज्य शासनाने भारताच्या महानियंत्रक व लेखा परीक्षकांच्या सल्ल्यानुसार विहित केलेले आहेत.

(२) (क) पूर्वोक्त राज्य हज समिती, सुयोग्य लेखे आणि अन्य सुसंगत अभिलेख, लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र, ज्यामध्ये जमा खर्चाच्या माहितीसह ताळेबंदही असेल.

(ख) सदर लेख्यांचे, अंतर्गत लेखा परिक्षण आर्थिक वर्षात किमान एकदा, लेखा व कोषागारे संचालनालयाकडून पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(ग) या लेख्यांचे, वार्षिक परिक्षण, भारताच्या महानियंत्रक व लेखा परिक्षकाद्वारे सुध्दा करण्यात येईल.

(३) (क) लेखा परिक्षणाकरिता लेखा परिक्षकांस राज्य हज समितीचे सर्व लेखे, अभिलेखे व पत्रव्यवहार पहावयाचा अधिकार असेल.

(ख) लेखा परिक्षकाने उपस्थित केलेल्या आक्षेपांची कार्यकारी अधिकारी कमीत कमी विलंब लावून पूर्तता करील व आक्षेपांना दिलेली उत्तरे पूर्वोक्त राज्य हज समितीच्या मंजूरीसह सादर करील.

(४) आक्षेप व पूर्वोक्त राज्य हज समितीने आक्षेपांना दिलेल्या उत्तरांची एक प्रत राज्य शासनाच्या विचारार्थ सादर करण्यात यावी.

(५) लेखा परिक्षकाद्वारे प्रमाणित पूर्वोक्त राज्य हज समितीचे लेखे त्यावरील लेखा परिक्षकांच्या अहवालासहीत, राज्य हज समितीतर्फे विधीमंडळाच्या सभागृहांसमोर ठेवण्याकरिता राज्य शासनास पाठविण्यात येतील.

(६) लेखा परिक्षण केलेल्या लेख्यांची संक्षिप्त माहिती राज्य शासनाने विनिर्दिष्टित केल्यानुसार राज्य हज समिती सर्वसाधारण राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करील.

२१. **राज्य हज समितीद्वारे सादर करावयाची विवरणपत्रे, विवरण व अहवाल.**---(१) कार्यकारी अधिकारी प्रत्येक वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी तीन महिन्यांच्या आत, तत्पूर्वीच वित्तीय वर्षामध्ये राज्य हज समितीच्या प्रशासनासंबंधी एक विस्तृत अहवाल, त्या वर्षात राज्य हज निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या रकमा तसेच खर्च करण्यात आलेल्या रकमा दर्शविणाऱ्या विवरणपत्रासह त्या वर्षात राज्य हज निधी खात्यात शिल्लक जमा दर्शविणारे एक विवरणपत्र तयार करून राज्य शासनास सादर करील.

(२) (क) प्रशासकीय अहवालाची प्रत, पूर्वोक्त विवरणपत्रासह राज्य हज समितीच्या प्रत्येक सदस्यास, राज्य हज समितीस त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर त्या वर्षानंतरच्या जून महिन्यात होणाऱ्या सर्वसाधारण बैठकीपूर्वी किमान आठ दिवस अगोदर पाठविण्यात यावी.

(ख) अशा अहवालाची प्रत व विवरणपत्र कोणत्याही व्यक्तीस त्याच्या मागणीनुसार, कार्यकारी अधिकारी राज्य हज समितीच्या मंजुरीने, निश्चित करील अशा किंमतीचा भरणा केल्यावर उपलब्ध करून देण्यात येईल.

२२. **वित्तीय बाबींवर राज्य हज समितीचे नियंत्रण.**---(१) राज्य शासन कोणत्याही वेळी, राज्य हज निधीचे लेखे तपासण्याकरिता व त्याचा अहवाल शासनास सादर करण्याकरिता विशेष लेखापरिक्षकाची नियुक्ती करू शकेल.

(२) अशा लेखा परिक्षणाचे राज्य शासनाने निर्धारित केलेले शुल्क राज्य हज निधीतून भागविण्यात येईल.

परिशिष्ट

[पहा नियम ५ (२) (अ)]

परिच्छेद-१.—महानगरपालिका, ज्यांची स्थापना मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८ ; नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये झाली आहे.

परिच्छेद-२.—नगर परिषद व नगर पंचायत, ज्यांची स्थापना महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये झाली आहे.

परिच्छेद-३.—जिल्हा परिषद, ज्यांची स्थापना महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये झाली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. एस. काद्री,**

शासनाचे सहसचिव.

क्रमांक हज २००५/प्र.क्र.७/०५/का-५
अल्पसंख्यांक विकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १२ ऑक्टोबर २००९

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
धर्मादाय आयुक्त, मुंबई / सर्व सहायक धर्मादाय आयुक्त,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
संचालक, उच्च शिक्षण, मुंबई,
संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई,
संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई,
संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), पुणे,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी),
निवड नस्ती.

---

* पत्राने.